**<u>पी. डब्ल्यु. डी. व्ही. ए. क्र. ११७/२०२४ मधील दिनांक ०३.०६.२०२४ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा अर्ज मूळ अर्जदार हिने महिलांचे कौटूंबिक हिंसाचारापासून संरक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ अन्वये दाखल केला आहे.

२. अर्जदार हिचे कथन संक्षिप्तरित्या असे आहे की, लग्नाच्या ५ वर्षात अर्जदाराने या नात्यात नि:स्वार्थपणे भावनिक, शारिरीक, मानसिक व आर्थिकदृष्टया दिले आहे आणि स्वाभिमान, आधार आणि प्रेम याशिवाय काहीही मागितलेले नाही ज्यापासुन तिला वंचित ठेवण्यात आले आहे. जाबदार क्र. १ ने अर्जदाराला कोणताही आर्थिक आधार दिलेला नाही. अर्जदाराला आज कोणताही स्वाभिमान, आत्मविश्वास व पैसा उरला नाही आणि तिच्याकडून सर्व काही हिरावून घेण्यात आले आहे. अर्जदार आज मानसिक आणि भावनिकदृष्टया खचली आहे. अर्जदार तिच्या मुलाची काळजी घेण्यास असमर्थ आहे. कारण तिला आर्थिक मदतीसाठी तिच्या पालकांवर अवलंबून राहण्याशिवाय पर्याय नाही. अन्न, कपडे व शिक्षण यासारख्या मुलभुत गरजांची तरतुद अर्जदाराच्या वडिलांनी दिलेलया पैशातुन केली जात आहे. अर्जदाराला जाबदाराकडून प्रचंड वेदना आणि दुखापत झाली आहे. अर्जदार गेल्या काही दिवसांपासुन एक रात्रही शांत झोपलेली नाही. तिला आठवत असेल तोपर्यंत अर्जदार मानसिक, शारिरीक आणि भावनिकदृष्टया खचलेली आहे. लग्नापासुनच जाबदार नेहमीच तिच्या चारित्र्यावर संशय घेत आहे. जाबदार क्र. १ हा टिपटॉप इंजिनिअरिंग वर्क्स या नावाने व्यवसाय करत आहे. तसेच टिपटॉप कमर्शियल किचन हे पुणे—नाशिक महामार्गावर स्थित आहे व भाउ पाटील रोड, बोपोडी गावठाण, कुंदन पॅराडाईजसमोर पुणे येथे स्थित आहे. पुणे स्टील इक्विपमेंट्स हे बोपोडी गावठाण पुणे येथे स्थित आहे. तसेच स्टील इक्विपमेंट्स आहेत आणि त्यांच्याकडे स्थावर मालमत्ता आहेत. म्हणजेच द ग्रॅंड सेंट्लमधील ग्रॅंड फलोअरवर असलेले दुकान गेट क्र. <u>१६३८/३९</u>, गावडे पेट्रोल पंपाजवळ, पुणे नाशिक महामार्ग पुणे तसेच शेवरलेट क्रुझ कार देखील आहे. त्याचा नोंदणी क्र. एम.एच. ४३ ए. टी. ६७०७ आणि रेनॉल्ट केडब्ल्युआयडी क्लाइंबर जिचा नं. एम एच १४ जे आय ६०४४ असा आहे. जाबदार क्र. १ कडे पुरेसे आर्थिक साधन आहे. परंतु तरीही तो अर्जदार आणि अल्पवयीन मुलीचे पालनपोषण करण्यास दुर्लक्ष करत आहे आणि नकार देत आहे. अर्जदार स्वत:चे आणि तिच्या मुलीचे पालनपोषण करण्यास असमर्थ आहे. अर्जदाराच्या म्हणण्यानुसार, तिचा सांभाळ, पालनपोषण, पोटापाण्याची, औषधोपचाराची वगैरे सर्व कौटुंबिक व्यवस्था करणेची नैतिक जबाबदारी जाबदार क्र. १ यांची आहे.

शेवटी जाबदार क्र. १ यांनी अर्जदार व तिच्या मुलीला एकुण दरमहा रुपये २५,०००/— पोटगी म्हणून दयावी, अशी विनंती केली.

**३.** जाबदार क्र. १ ते १२ यांनी प्रस्तुत अंतरिम पोटगीच्या अर्जाला म्हणणे दाखल केले आहे. सदर अर्जामध्ये त्यांनी प्रस्तुतचा अर्ज खोटा व त्यातील संपुर्ण मजकुर चुकीचा आहे असे कथन केले. अर्जदार यांनी निव्वळ खोटे, बिनबुडाचे आरोप करुन जाबदेणार यांना मानसिक व शारिरीक आणि आर्थिक त्रास देवून वाईट उद्देशाने प्रस्तुतचा खोटा अर्ज दाखल केला आहे. जाबदार यांनी त्यांच्या म्हणण्यामध्ये असे कथन केले आहे की, अर्जदार व जाबदार क्र. १ यांचे लग्न ठरले त्यावेळी जाबदार यांनी अर्जदाराच्या कुटुंबाकडे लग्नाची कोणतीही मागणी केलेली नाही. सदर अर्जदार आणि जाबदार क्र. १ यांचा विवाह दिनांक २९.०३.२०१८ रोजी कॅम्प, पुणे येथे मुस्लिम रितीरिवाजाप्रमाणे झाला. लग्नासाठी हॉल हा अर्जदाराच्या मामाचा असल्याने सदर हॉलसाठी कोणतेही पैसे देण्याची आवश्यकता नव्हती. लग्नात जाबदार क्र. १ ने अर्जदाराला काही सोन्याचे दागिने दिले. लग्नानंतर काही दिवस अर्जदार ही जाबदार क्र. १ ते ४ यांच्याशी चांगली वागली. परंतु लग्नाच्या दोन ते तीन महिन्यांत, अर्जदार वारंवार तिच्या पालकांच्या घरी जावू लागली व जाबदार क्र. १ व त्यांच्या घरच्यांशी असभ्यपणे बोलू लागली आणि भांडणे करु लागली. जाबदार क्र. १ ने वारंवार अर्जदार हिला समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. परंतु अर्जदाराच्या भांडखोर आणि रागीट स्वभावामुळे जाबदार क्र. १ हे नेहमी गप्प राहायचे. सप्टेंबर २०१८ मध्ये अर्जदार ही गर्भवती होती आणि जाबदार क्र. १ ते ३ हे तिची काळजी घेत होते. तरी देखील अर्जदार ही त्यांच्याशी भांडणे करत असे व डॉक्टरांनी लिहून दिलेली कोणतीही औषधे वेळेवर घेत नसे. त्यानंतर २९ सप्टेंबर रोजी अर्जदाराच्या पोटात दुखु लागले म्हणुन जाबदार क्र. १ ने तिला दवाखान्यात आणले. त्यावेळी त्यांना दवाखान्यात समजले की, गर्भाच्या ह्दयाचे ठोके थांबले असल्याने गर्भपात झाला आहे. त्यानंतर अर्जदार ही पुन्हा गर्भवती राहिली व तिला मुलगी झाली. मुलीच्या जन्मानंतर अर्जदार ही सदर मुलीला दुर ठेवू लागली. दिनांक ०६.०४.२०२१ रोजी जाबदार क्र. ४ व ५ च्या लग्नाच्या वेळी अर्जदाराने घरात जाबदार क्र. १ व ५ शी जाणुनबुजुन भांडणे करण्यास सुरुवात केली. अर्जदार हिने जाबदार क्र. १ चा पती म्हणुन आदर केला नाही. ती नेहमी भांडणे करुन तिच्या माहेरी जात असे व सासरी लवकर परत येत नसे. अर्जदार ही नेहमी जाबदार क्र.

१ ला म्हणत असे की, मी तुमच्याबरोबर राहू शकत नाही तुम्ही दुस—या मुलीसोबत लग्न करा. त्यामुळे जाबदार क्र. १ अर्जदाराच्या नेहमीच्या छळाला कंटाळून इस्लामिक वैयक्तिक कायदयानुसार दुसरा विवाह दिनांक २५.१२.२०२२ रोजी मुंबई येथे जाबदार क्र. ६ हिचेशी केला. दुस—या विवाहानंतर अर्जदार ही तिच्या मुलीसह तिच्या वडीलांच्या घरी निघुन गेली. त्यानंतर अर्जदार हिने जाबदार यांचे घर सोडल्यानंतर अर्जदाराने जाबदार क्र. १ विरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. त्यानंतर अर्जदार हिने जाबदार क्र. १ ला त्याची मुलगी झमझम हिला भेटून दिले नाही. अर्जदार आणि तिच्या पालकांनी जाबदारांकडून पैसे उकळण्यासाठी जाबदार यांना सतत ब्लॅकमेल करण्यास सुरुवात केली. म्हणुन जाबदार क्र. १ ने अर्जदार आणि तिच्या घरच्यांविरुध्द ०३.०६.२०२४ रोजी एनसी दाखल केली. जाबदार क्र. १ यांनी संसार टिकविण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केला. परंतु अर्जदार नेहमीच जाबदा यांच्याशी क्षुल्लक कारणे काढून भांडणे करुन माहेरी जात असे व जाबदार यांना नेहमी मानसिक त्रास देत असे. त्यामुळे सदरचा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली आहे.

४. अर्जदार यांचा प्रस्तुतचा अर्ज व त्यावर जाबदार यांनी दिलेले त्यांचे म्हणणे वाचले. दोन्ही विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावर असलेल्या दस्तऐवजांचे अवलोकन केले. अर्जदार व जाबदार यांचे पती—पत्नीचे नातेसंबंध आजतागायत अस्तित्वात आहेत. जाबदारांनी अर्जदाराला टाकून दिलेले आहे व तेव्हा पासून ती व तिची मुलगी विभक्त राहत आहे. अर्जदार ही विभक्त राहात असल्याचे कारण अर्जदार हिने तिच्या निशाणी १ मध्ये कथन केले आहे. उभयपक्षांच्या कथनांमधील सत्यता पुराव्या दरम्यान पडताळुन पाहता येईल. प्रस्तुत अर्जावर आदेश करताना प्रथमदर्शनी सध्याची परिस्थिती विचारात घेणे गरजेचे आहे. अर्जदार कोणत्याही सबळ कारणाशिवाय तिचा संसार सोडून जाईल हे शक्य वाटत नाही. अर्जदार ही विभक्त रहात आहे. जाबदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ व २ यांच्या उदरनिर्वाहाची व्यवस्था केलेली नाही, ही बाब आर्थिक छळवणुक या प्रकारामध्ये येते. त्यामुळे आर्थिक सहाय्याबाबत अंतरिम आदेश करणे योग्य होईल.

५. अर्जदाराच्या कथनाप्रमाणे जाबदार क्र. १ हा टिपटॉप इंजिनिअरिंग वर्क्स या नावाने व्यवसाय करत आहे. तसेच टिपटॉप कमर्शियल किचन हे पुणे—नाशिक महामार्गावर व पुणे स्टील इक्विपमेंट्स हे बोपोडी गावठाण पुणे स्थित आहे. तसेच

त्यांच्याकडे स्थावर मालमत्ता आहेत. या सर्व व्यवसायातुन त्याला उत्पन्न मिळते. तसेच त्याच्याकडे चारचारी गाडी आहे. परंतु अर्जदाराने जाबदार क्र. १ याला वरील सर्व व्यवसायातुन उत्पन्न मिळते याबाबत अभिलेखावर कोणताही पुरावा दाखल केलेला नाही. तसेच जाबदार क्र. १ यांनी त्यांच्या उत्पन्नच्या शपथपत्रामध्ये असे नमुद केले की, त्याचे एक शॉप आणि एक ऑफीस आहे. परंतु सदर शॉप व ऑफीसचा एकटा मालक नसुन त्याचा भाउ सुध्दा मालक आहे. जरी जाबदार क्र. १ याचा भाउ सदर शॉप आणि ऑफीसमध्ये सहमालक आहे तरी सुध्दा सदर शॉपमधुन जाबदार क्र. १ याला उत्पन्न मिळत असेल. पुढे असे आहे की, तो इंडियन गॅलेक्सी स्टील इक्वीपमेंटमध्ये कामाला असून त्यापासून त्याला दरमहा १७ हजार इतके उत्पन्न मिळते. त्यामुळे जाबदार क्र. १ कमवित असून त्याला उत्पन्नाचे साधन आहे असे दिसुन येते. तसेच तो अर्जदारांना खाउटी देण्यास समर्थ आहे.

**६.** जाबदार क्र. १ यांचेवर अर्जदार क्र. १ पत्नी व २ मुलगी म्हणून पालनपोषणाची कायदेशिरच नव्हे तर नैतिक जबाबदारी देखील आहे. त्यामुळे वरील परिस्थितीचा विचार करता व आजची आर्थिक परिस्थिती लक्षात घेता मी खालीलप्रमाणे आदेश करीत आहे.

## <u>आ दे श</u>

**१.** प्रस्तुतचा अर्ज अशंत: मंजुर करण्यात येत आहे.

**२.** जाबदार क्र. १ याने अर्जदार क्र. १ हिला दरमहा रक्कम रू. ५,०००/— व अर्जदार क्र. २ हिला दरमहा रक्कम रू. ३,०००/— प्रस्तुतचा अर्ज दाखल तारखेपासून पोटगी स्वरूपात दयावे, असा अंतरिम आदेश पारित करण्यात येत आहे.

**३.** सदर आदेशाची प्रत अर्जदार व जाबदार यांना विनामुल्य देण्यात यावी.

PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE
Digitally signed by PRANESHKUMAR BADRINATH BHARPURE
Date: 2026.03.18 17:32:15 +0530

(पी. बी. भरपुरे)
२रे न्यायदंडाधीकारी प्रथम वर्ग,
लष्कर न्यायालय, पुणे.

दिनांक १८.०३.२०२६